# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक
कालमर्यादित दिनांक : २५.३.२०१९.

क्रमांक : १०/एनजीपी/एआयसीटीई/२०१९-२०/ना-हरकत/ २९८
दिनांक : 20 MAR 2019

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यमान पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या साईट/ लोकेशन मध्ये बदल करणे, विद्यमान पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था बंद करणे, , पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे, इ. करीता शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्राबाबत...

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रियेसाठी प्रसिध्द केलेली जाहिर सूचना [PUBLIC NOTICE FOR APPROVAL PROCESS 2019-20]

२. या संचालनालयाची जाहिर सूचना क्रमांक : २(३)/एनजीसी/मान्यता/२०१९/३५, दिनांक : १५.१.२०१९.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भाधीन जाहिराती अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता परीषदेमार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवरील ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०१९-२० मधील मार्गदर्शक सूचनांनुसार आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (टेक्निकल इन्स्टिट्यूशनकरिता मान्यतेला मंजूरी) नियम, २०१६ चे विनियम व पहिली दुरुस्ती, २०१७ नुसार ऑन लाईन पध्दतीने दिनांक १४.१.२०१९ ते दिनांक ८.२.२०१९ या कालावधीत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून अर्ज मागविण्यात आलेले होते. तसेच विद्यमान संस्थासाठी (एपीएच २०१९-२० च्या तरतूदींनुसार) दंड भरुन मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक १३.२.२०१९ हा निर्धारित केलेला होता.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता विद्यमान संस्थेच्या साईट/ लोकेशन मध्ये बदल करणे, विद्यमान संस्था बंद करणे, पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे, इ. बाबत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था परीषदेच्या सूचनेनुसार प्रस्ताव सादर केलेले आहेत, अशा संस्थांची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने शासनामार्फत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शिफारस करण्याच्या दृष्टीकोनातून परिषदेमार्फत निर्धारित व खालील नमूद कागदपत्र या संचालनालयास सादर करावेत. नमूद कागदपत्र संचालनालयास सादर न केल्यास संचालनालयामार्फत अशा संस्थांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शासनास शिफारस करण्यात येणार नाही ह्या बाबीची संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

१. संबंधीत संस्थेच्या अध्यक्ष / सचिव यांची स्वाक्षरीसह अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेल्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०१९-२० मध्ये विहित नमुन्यात संस्थेच्या ठरावाची मुळ प्रत.

२. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता देण्यात आलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत.

३. प्रवेशित विद्यार्थी किंवा नेमणुक केलेले कर्मचारी यांचे पर्यायी समायोजन कसे करणार याबाबतची कार्यपध्दती नमूद करुन याबाबत काही न्यायालयीन प्रकरण उध्द्भवल्यास त्यास तंत्रशिक्षण संचालनालय किंवा शासन जबाबदार राहणार नाही त्याची जबाबदारी पुर्णपणे संस्थेची राहील अशा आशयाचे १०० रु. च्या स्टॅंपपेपर वर संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता केलेल्या नोंदणीकृत हमीपत्राची मुळप्रत.

४. शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता संस्थेने सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत विनंती पत्र.

५. शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता संस्थेने संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास प्रस्ताव सादर करतांना भरलेल्या शुल्काच्या पावतीची प्रत.

६. संस्थेविरुध्द न्यायालयीन प्रकरणे, गंभीर दोषारोप, नियमांचे उल्लंघन, रॅगींग, तकारी इ. प्रकरणे प्रलंबित नसल्याबाबत रु. १००/- च्या स्टँपपेपर वर संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता केलेल्या नोंदणीकृत हमीपत्राची मुळप्रत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संदर्भ क्रमांक १ वरील जाहिरातीच्या अनुषंगाने संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक २ वरील जाहीर सूचने अन्वये राज्यात शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता विद्यमान संस्थेच्या साईट/ लोकेशन मध्ये बदल करणे, विद्यमान संस्था बंद करणे, पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे, इ. बाबत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था परीषदेच्या सूचनेनुसार प्रस्ताव सादर केलेले आहेत, अशा संस्थांची प्रस्तावांच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय स्तरावर तपासणी करण्यात आलेली आहे. अशा संस्थांमार्फत शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत खालील तक्त्यात नमूद संस्थांकडून संदर्भ क्रमांक २ वरील संचालनालयाच्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे संबंधीत संस्थेंच्या नावासमोर नमूद स्तंभ क्रमांक ४ मध्ये नमूद उपरोक्त अनुक्रमांकावरील कागदपत्र संचालनालयास सादर न केल्यामुळे सदर संस्थांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनास करावयाच्या शिफारशी संचालनालय स्तरावर प्रलंबित ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर संस्थांची व संस्थानिहाय प्रस्तावातील त्रुटींची माहिती खालील प्रमाणे आहे.

Closure of institutes for Academic Year २०१९-२०.

| अ.क्र. | डीटीई कोड | संस्थेचे नाव | ट्रस्ट / सोसायटीचे नाव | उपरोक्त नमूद मुद्यानुसार सादर करावयाचे कागदपत्रांचा अनुक्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | | 4 |
| 1 | 4240 | Central India Institute of Polytechnic, Koradi Road, Near Koradi Naka, At post. Lonara-441111 | Mehmuda Shikshan & Gramin Vikas Bahuddeshiya Sanstha, 690, 691, Golcha Marg, Sadar Bazar, Nagpur-440001 | **1,2,3,4,6** |
| 2 | 4222 | KDK Nagpur Polytechnic, Jagnade Square, Great Nag Road, Nandanvan, Nagpur | Backward Class Youth Relief Committee, 141, Rajvilla, Khamla Road, Nagpur | **1,2,3,4,5,6** |
| 3 | 4239 | Baburaoji Tidke Polytechnic, Mouda, Tal. Mouda, Dist. Nagpur | The Shriram Gram Vikas Shikshan Sanstha, Nagpur | **1,2,4,5,6** |
| 4 | 4599 | Shri Bahulalji Agnihotri School of Technology, Nagthana Road, Near Bypass Hay way, Sindhi(Meghe), Wardha | Jai Mahakali Shikshan Sanstha, Bapuji Wadi, Ramnagar, Wardha | **1,2,4,6** |
| 5 | 6457 | Dattakala Polytechnic, At Gat No. 541/2, Off Pune-Solapur Highway, Swami-Chincholi (Bhigwan), Tal-Daund, Dist-Pune-413130. | Dattakala Shikshan Sanshta, At Gat No. 541/2, Off Pune-Solapur Highway, Swami-Chincholi (Bhigwan), Tal-Daund, Dist-Pune-413130. | **1,2,3,4,5,6** |

तरी, संबंधीत संस्थांनी संचालनालयाच्या सदर परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या नावासमोर नमूद उपरोक्त तक्त्यातील नमूद अनुक्रमांकावर, नमूद केलेले कागदपत्र दिनांक २२.३.२०१९ पर्यंत संचालनालयास सादर करावेत अन्यथा संचालनालयामार्फत सदर संस्थांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ना-हरकत प्रमाणपत्र

देण्याबाबतच्या शिफारशी शासनास सादर करणे शक्य होणार नाही व होणाऱ्या विलंबाची व पुढील परिणामांची संपुर्ण जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
सहसंचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर/ पुणे त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या अखत्यारीतील उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.
२. कार्यासन क्रमांक ३ (आयटीसेल), मुख्य कार्यालय, मुंबई (सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.)
३. निवडनस्ती.